# घटक प्रत्यायाचे सिद्धान्त

गो. वि. सोवनी

चार पांच वर्षांपूर्वी पुणें विद्यापीठांतील पदव्युत्तर परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक उत्पादनाच्या संबंधीचे प्रत्यायाचे सिद्धांत नीट माहीत नसतात आणि ते बरोबर समजलेलेहि नसतात असें आकस्मिकपणें आढळून आलें. हे सिद्धान्त पदवी-परीक्षेच्या अभ्यासक्रमांतच शिकविले जातात आणि ते नीट झालेले आहेत असें गृहीत धरूनच पदव्युत्तर परीक्षेचा अभ्यासक्रम आंखलेला असल्यामुळें त्यांचें पुन्हां विवेचन करण्याचा प्रसंग क्वचितच येतो. तसा प्रसंग आला तरी पूर्वी झालेला प्राथमिक स्वरूपाचा विषय म्हणून त्याचें विवेचनहि थोडें आणि तुटपुंजेंच केलें जातें. शिवाय पदवीपूर्व, पदवी अगर पदवीनंतरच्या कोणत्याच वर्गांत विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची अगर विद्यार्थ्यांनीं शंका विचारण्याची पद्धत जवळजवळ नसल्यामुळें यासंबंधीं विद्यार्थ्यांची समजूत पडली आहे किंवा नाहीं हें सहसा कळण्याचा मार्ग नसतो. म्हणूनच वर मीं "आकस्मिक" हा शब्द हेतुपुरस्पर योजिला आहे. विद्यार्थ्यांना त्रासदायक वाटणारी प्रश्न विचारण्याची दुष्ट पद्धत मी माझ्या वर्गांत मधून मधून वापरतों. तथापि मी जो विषय शिकवतों त्यांत या सिद्धांतांचा थोडा दूरान्वयानेंच संबंध येतो. त्यामुळें त्याच्याबद्दलच्या गैरसमजुतीविषयीं मला अपघातानेंच समजणें शक्य होतें. परंतु तें तसें समजल्यावर मी हा "अपघात" दरवर्षी घडवून आणूं लागलों. त्यावरून हे सिद्धान्त विद्यार्थ्यांना नीट कळलेले नसतात, त्या सिद्धान्तावर आधारलेल्या विवेचनासंबंधीं त्यांना नेहमींच चांचपडल्यासारखें होतें व त्याचें नीट आकलन होत नाहीं हें लक्षांत आलें.

असें कां व्हावें ? याचा विचार करतांना ही स्थिति पुणें विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची आहे आणि इतरत्र नाहीं कीं काय हें प्रथम शोधावें असें वाटलें. तसें करण्याची शक्यताहि आहे हेंहि लगेच जाणवलें. आमच्या संस्थेंत अर्थशास्त्रांतील सर्वोच्च पदवीसाठीं प्रबंध लिहिणाऱ्या कांहीं निवडक विद्यार्थ्यांना दरवर्षी पाठ्यवेतनें देण्यांत येतात. त्यासाठीं सर्व हिंदुस्थानांतून अर्ज मागविण्यांत येतात, आणि त्यांतील दहा पर्यंत विद्यार्थी पाठ्यवेतनें देण्यासाठीं निवडले जातात. हे विद्यार्थी निरनिराळ्या विद्यापीठांच्या पदव्युत्तर परीक्षा अर्थशास्त्र हा विषय घेऊन पहिल्या अगर दुसऱ्या श्रेणींत उत्तीर्ण झालेले असतात. आमच्या संस्थेंत त्यांना एक वर्षपर्यंत संशोधनास आवश्यक असें शिक्षण देण्यांत येतें व त्यांतून अधिक निवड करून त्यांपैकीं कांहींना प्रबंध लेखनासाठीं आणखी दोन ते अडीच वर्षेपर्यन्त पाठ्यवेतन देण्यांत येतें. वर सांगितलेला विचार मनांत आल्यावर या विद्यार्थ्यांचीहि यासंबंधीं चांचणी घ्यावी असें सहजच सुचलें. त्याप्रमाणें प्रथम गंमत म्हणून व नंतर दरवर्षी घ्यावयाचा धडा म्हणून अशी चांचणी घेऊं लागलों. तेव्हां त्यांनाहि त्या विषयाची समजूत नीट व स्पष्ट नसून त्यांचीहि स्थिति पुणें विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांहून फार निराळी नाहीं असें स्पष्ट दिसलें.

या गैरसमजुतीची कारणमीमांसा आतां विद्यार्थ्यांचें दुर्लक्ष वगैरे सहज सुचणाऱ्या कारणांपासून पाठ्यपुस्तकांपर्यंत न्यावी लागली. बऱ्याच मराठी व परदेशीय नामवंत ग्रंथकारांनीं लिहिलेल्या इंग्रजी पाठ्य-पुस्तकांतूनहि या सिद्धान्तांसंबंधीचें विवेचन सुसूत्र, बिनचूक, स्पष्ट व